**Project Name - ठाणे जिल्हयातील तलासरी तालुक्यातील वारली समाजावर साम्यवादी चळवळीच्या प्रभावाचा अभ्यास - इ.स. "१९४५-१९७५"**

Minor Research Submitted to the

University Grant Commission

Under the Faculty of Arts

RESEARCHER

Smt. HEMLATA U. MUKANE

Lecturer in Art

Shri M.D. Shah Mahila College of Arts and Commerce, Malad,

Mumbai-400 064.

Summary -

Introduction –

भारत सरकारच्या व महाराष्ट्र शासनाच्या परिपत्रकानुसार महाराष्ट्रामध्ये ४७ आदिवासी जमाती आहेत. महाराष्ट्रात एकूण ३५ जिल्हये आहेत. त्यामध्ये १० आदिवासी जिल्हे आहेत. त्यामधील ठाणे हा मुंबईचा जवळचा महत्वपूर्ण आदिवासी जिल्हा आहे. हया जिल्हायात एकूण १५ तालुके आहेत. भारताच्या स्वातंत्र्य आंदोलनात ठाणे जिल्हयाने महत्वाची भूमिका पार पाडली आहे. या जिल्हयात वारली, कातकरी, ठाकूर व मल्हार कोळी या जमातीची वस्ती प्रामुख्याने आढळते.

या जिल्हयातील तलासरी तालुक्यात अनेक जात-जमातीचे लोक राहत असेल तरी 'वारली' हा समाज ८९ टक्के राहतो. 'वारली' हा शब्द कसा निर्माण झाला असावा या बद्दल मतभिनत्ता आढळते. काहीच्या मते ही भिन्न जमातीची पोटजात आहे. या तालुक्यात ४६ गावे आहेत २००१ साली झालेल्या जनगणनेनुसार तलासरी तालुक्यातील वारलींची संख्या १२१२१७ इतकी होती. २१व्या शतकातही सहज मिळणाऱ्या उपलब्ध साधन सामुग्रीवर त्यांचे जगणे आधारलेले असते. तरीसुध्दा जीवनाचा प्रत्येक क्षण हा आनंदाभीमुख व्हावा यासाठी तो प्रयत्नशील असतो. परंपरावादी अशिक्षित, अंधश्रध्दाळु व दारिद्रयाच्या जोखमात अडकुन जीवन जगणारा हा समाज आर्थिक, सामाजिक व राजकीयदृष्टया अत्यंत मागासलेला

आहे. स्वातत्र्याचे आकलन व मुलभूत हक्काच्या अनंत अडचणी निर्माण झाले आहेत. स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये तर या मार्गातील आदिवासी हा वेठबिगार, जमिनदार, सावकार व धनाढय व्यापाऱ्यांच्या दावणीला गुराढोराप्रमाणे बांधला गेला होता. मुकी जनावरे पाळावीत व हाकावीत त्याप्रमाणे त्यांचे जीवन होते.

साम्यवादी चळवळीचे प्रभावक्षेत्र असलेल्या महाराष्ट्रामधील ठाणे जिल्हा हा साम्यवादी चळवळीची कर्मभूमी म्हणुन ओळखला जातो. साम्यवादी चळवळीच्या जनसंघटनेच्या रुपात किसान सभेमार्फत त्यांच्यावर होणाऱ्या अन्याय अत्याचारा विरोधी या भागात डॉ.शामराव व गोदावरी परुळेकर, ॲ. दळवी, कॉ. रणदिवे, कमा इ. किसानसभेच्या नेत्यांनी आदिवासींमधे सामाजिक, राजकीय व त्यांच्या शोषणाविरोधी जागृती निर्माण करुन त्यांना, साम्यवादी विचारसरणीच्या नेतृत्वाखाली संघटनात्मक लढयासाठी उभे केले. त्यामुळे त्यांच्यावर होणाऱ्या शोषणावर हळुहळू बराच अंकुश बसला. पुढे त्यांना साम्यवादी चळवळीद्वारे आपल्या सार्मथ्याची जाणीव करुन आपल्या हक्क व अधिकार प्राप्तीच्या लढयासाठी त्यांना संघटनात्मक, वैचारिक बळ मिळवून दिले.

## Objectives –

संशोधकाने संशोधनाची उदिष्टये पुढीलप्रमाणे घेतली आहेत.

१) राजकीय हक्क, कर्तव्याची जाणी नसलेला, शैक्षणिक दृष्टया मागासलेला व सामाजिकदृष्टया परंपरागत विचार सरणीत खितपत पडलेल्या आदिवासी समाजामध्ये साम्यवादी विचारांचे आकर्षण कसे निर्माण झाले व साम्यवादी विचारांशी तो एकनिष्ठ राहून पुढे राजकीयदृष्टया साम्यवादी चळवळीमध्ये निष्ठेने चळवळीला आधारस्तंभ का व कसा बनला याचा शोध घेणे.

२) साम्यवादी चळवळ व पक्ष संघटने मार्फत आदिवासींच्या सर्वांगीण प्रगती, उन्नती, आणि जीवनमानाशी निगडीत प्रश्न सोडविण्यासाठी साम्यवादी संघटनेमार्फत केल्या गेलेल्या कार्याची माहिती मिळवणे.

३) साम्यवादी चळवळ संघटनेच्या या भागातील कार्या संदर्भात लिखित उपलब्ध माहितीचे संकलन करुन साम्यवादी चळवळीच्या कार्याचा आढावा घेणे.

४) साम्यवादी चळवळ व संघटना ज्या घ्येय उदिष्टांने प्रेरित होऊन स्थापन झाले यापैकी संघटनेने कोणती घ्येय, उदिष्टे किती प्रमाणात साध्य कली त्याची माहिती गोळा करणे.

५) साम्यवादी चळवळ व तिच्या संघटनेद्वारे तलासरी तालुका या क्षेत्रातील अभ्यास कालखंडा मध्ये (१९४५-७५) आदिवासींचे प्रश्न, समस्या सोडविण्यासाठी आणि त्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी साम्यवादी चळवळीच्या कार्याची येथील आदिवासींवर झालेली परिणामकारकता याचा अभ्यास करणे.

६) साम्यवादी चळवळ व संघटनेच्या आदिवासी भागातील कार्यातून पुढे या चळवळी व संघटनेसाठी आजपर्यंत आदिवासी समाजामध्ये कुशल नेतृत्व व किती कार्यकर्ते या समाजातून समाजकार्यासाठी घ्येयाने प्रेरित होऊन निर्माण झाले पुढे आले याची माहिती घेणे.

Methodology –

१) प्रस्तुत संशोधनात वर्णनात्मक सर्वेक्षण पध्दतीचा वापर केला जाणार आहे.

२) नमुना निवड करताना साम्यवादी चळवळी, संघटनातील कार्यकर्ते, पदाधिकारी व नेते, पुढारी यांच्या मुलाखती घेतल्यानंतर जाणार आहेत.

३) संशोधनाठी योग्य प्रश्नावली तयार करुन ती चळवळीतील कार्यकर्ते पदाधिकारी व नेते पुढारी यांच्याकडुन भरुन घेतल्यानंतर त्याविषयी संबंधीत हस्तपुस्तिका तयार केली जाईल. ती तज्ञांकडे पाठवून त्यांची मते अजमावली जातील व या मतांची संशोधनाच्या निष्कर्षासाठी उपयोग केला जाईल.

४) साम्यवादी चळवळीच्या केंद्रातुन प्रकाशित होणाऱ्या साहित्याचा संदर्भ म्हणून वापर केला जाईल.

५) साम्यवादी चळवळीच्या लिखित संदर्भ सहित्याचा अभ्यास करुन संशोधनाच्या निष्कर्षासाठी त्याचा वापर केला जाईल.

## Conclusion –

साम्यवादी चळवळीचा हा बालेकिल्ला असलेल्या ठाणे जिल्हयाचा आदिवासी भाग भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या वैचारिक प्रभावाखाली असल्याचे दिसून येते संशोधनानंतर असे लक्षात येते की दारिद्रय, अज्ञान, निरक्षरता, धार्मिक कर्मकांडाचे अवडंबर अनारोग्य, व्यसनाधिनता, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, शैक्षणिक, आर्थिक पिळवणूक अशा अनेक समस्यांनी हा 'जंगलाचा राजा त्रस्त आहे पण या साम्यवादी चळवळीमुळे हा समाज जागा झाला आहे. चळवळीच्या कार्यातून प्रेरणा घेऊन हा समाजाला आले. या चळवळीच्या अभ्यासाचे क्षेत्र हे बहुसंख्य आदिवासी लोकसंख्येचे असल्याने आदिवासींच्या परंपरागत जीवनामध्ये बरेच बदल घडून आलेले दिसुन येतात. जगातील राजकारण समजुन घेण्याची त्यांची जिज्ञासा वाढली आहे. मला माणूस म्हणुन जगण्याचा हक्क आहे असा विश्वास त्यांचात आला आहे.

## Use to Society –

जगामध्ये एखादया देशाची लोकसंख्या असावी इतक्या मोठया संख्याने हा आदिवासी समाज आपल्या देशात आहे. काही जिल्हे, तालुके तर पूर्णपणे आदिवासी म्हणुन शासनाने घोषीत केले आहे. या समाजाच्या कलाकृती पाश्चिमात्य देशा पर्यंत पोहचल्या आहेत. उदा. वारली पेंटींग्स, तारपानृत्य त्यामुळे परकीया चलन मिळुन देशाच्या अर्थव्यवस्थेला त्याचा हातभार लागू शकतो. राष्ट्रीय प्रवाहात या समाजाला सामील करुन घेतले. भारतीय संस्कृती समृध्द झाल्याशिवाय राहणार नाही. त्यांच्या साहित्याचा विकास झालेला दिसून येतो. म्हणुनच भारतीय आदिवासींचा शास्त्रशुध्द अभ्यास इतिहासकार, संशोधक, शिक्षक, विदयार्थी समाज या सर्वांनी करुन त्यांचे महात्म्य जगा समोर मांडले पाहिजे.